रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

## शिष्यवृत्ती नोटीस नवीन व नुतनीकरण - २०२०-२०२१

**११ वी व १२ वी कॉमर्स** **१०.०९.२०२०**

## अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती व बेगम हजरत महल नॅशनल शिष्यवृत्ती

ज्युनिअर महाविद्यालयातील अल्पसंख्यांक (मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारसी, जैन) कॅटेगिरीतील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती **(Minority Scholarship)** अर्ज ऑनलाईन सुरु झालेले आहेत संबंधीत पात्र विद्यार्थ्यांनी **nsp.gov.in/**https://scholarships.gov.in/ या वेबसाईडवर शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरुन सर्व कागदपत्र जोडून महाविद्यालयात १५/०९/२०२० ते २४/१०/२०२० अखेर सकाळी ११:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत जमा करावे.

अल्पसंख्यांक (मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारसी, जैन) कॅटेगिरीतील फक्त विद्याथिनींसाठी बेगम हजरत महल नॅशनल स्कॉलरशीप शिष्यवृत्ती अर्जदेखील ऑनलाईन सुरु झालेले आहेत संबंधीत पात्र विद्यार्थिनींनी अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती अर्ज किंवा बेगम हजरत महल नॅशनल स्कॉलरशीप **या पैकी एक अर्ज** ऑनलाईन भरुन सर्व कागदपत्र जोडून महाविद्यालयात खालील दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे जमा करावेत. https://scholarship-maef.org

अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचा अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांकडे एस.सी./ओ.बी.सी/ एन.टी. या कॅटेगिरीचा जातीचा दाखला असल्यास अशा विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांक किंवा एस.सी./ओ.बी.सी/ एन.टी. या शिष्यवृत्तीपैकी एकाच शिष्यवृत्तीचा अर्ज भरता येईल. दोन्ही अर्ज भरता येणार नाही.

**अल्पसंख्यांक कॅटेगिरीतील विद्यार्थिनींना (मुलींना ) अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती किंवा बेगम हजरत महल नॅशनल स्कॉलरशीप या पैकी एकाच शिष्यवृत्तीचा अर्ज भरता येईल.**

**अर्ज भरल्यानंतर खालीलप्रमाणे कागदपत्र अटेस्टेड किंवा सेल्फ अटेस्टेड करुन जोडावीत**

| | |
|---|---|
| १ | ऑनलाईन भरलेला अर्ज. |
| २ | अल्पसंख्यांकबाबतचे स्वत: प्रमाणित केलेले स्वयंघोषित प्रमाणपत्र व महाविद्यालय व्हेरिफिकेशन अर्ज. ( सदर अर्ज राहुल झेरॉक्समध्ये मिळतील ) |
| ३ | शाळा सोडल्याचा दाखला झेरॉक्स |
| ४ | ऑनलाईन मिळालेला बोनाफाईड |
| ५ | डोमासाईल सर्टिफिकेट / रहिवासी दाखला झेरॉक्स |
| ६ | रेशन कार्ड झेरॉक्स |
| ७ | आधार कार्ड झेरॉक्स |
| ८ | आधार कार्ड लिंक फॉर्म |
| ९ | सन २०२०-२१ मधील प्रवेश पावती झेरॉक्स |
| १० | सन २०१९-२० चा उत्पन्नाचा दाखला. वार्षिक उत्पन्न २.०० लाख रु.च्या आत. **(ओरिजनल उत्पन्न दाखला तहसिलदार यांचेकडील )** |
| ११ | दहावी व त्या पुढील गुणपत्रक ( मागील परीक्षेत किमान ५० टक्के गुण आवश्यक ) झेरॉक्स |
| १२ | बँक पासबुक झेरॉक्स |

अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती व बेगम हजरत महल शिष्यवृत्ती देण्याचे अधिकार सर्वस्वी केंद्र शासनाचे आहे. सदर शिष्यवृत्तीचे महाराष्ट्र राज्यासाठी संच निर्धारित केलेले आहे. त्यामुळे अर्ज भरणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती मिळत नाही याची अर्ज भरणाऱ्या संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्राचार्य,
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
श्रीरामपूर

Schol.Dept./E/:C.D. Jain College of Commerce/Shri. Wadankar D.S./Scholarship Notice